# मुस्लिमांच्या भूमीत असा तयार झाला ज्यूंचा देश इस्रायल, इस्रायलच्या जन्माची रक्तरंजित कथा



अमेरिका आणि इस्रायलनं शनिवारी (२८ फेब्रुवारी) इराणच्या अनेक शहरांवर हल्ला केला. अमेरिका आणि इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी मारले गेले आहेत. इराण आणि इस्रायलमधल्या या संघर्षामुळे इस्रायलचा इतिहास पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मुस्लिमांच्या भूमीत ज्यूंचा हा देश कसा तयार झाला? इस्रायलचा इतिहास सांगणारा हा लेख पुन्हा प्रसिद्ध करत आहोत. पण जिथे कोणत्याच सीमा आखलेल्या नाहीत, तिथे बाहेरच्या जगातून लोक येत राहून कालांतराने एका धर्माच्या लोकांचा देश कसा तयार होऊ शकतो? इस्रायलसंबधांत हाच प्रश्न मलाही पडला होता. इस्रायलच्या जन्माची कथा गुंतागुंतीची आहे आणि तुटक-तुटकही. तीच गुंतागुंत सोप्या शब्दात सलग उलगडून सांगण्याचा प्रयत्न या लेखात केलाय. यातून इस्रायलच्या जन्माची कथा तर कळेलच पण इस्रायलचा इतिहास, इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्षांचं मुळ, इस्रायल आणि अरब राष्ट्रांचं युद्ध याही प्रश्नांची उत्तर मिळतील. दुसऱ्या महायुद्धात ब्रिटन आणि मित्रपक्षांचा विजय झाला असला तरी ब्रिटनची अपरिमित हानी झाली होती. त्यांच्या वसाहतींचा कारभार हाकणं त्यांना अवघड झालं होतं, हळूहळू ते वसाहतींमधून माघार घ्यायला लागले. १९४८ च्या मे महिन्यात पॅलेस्टाईन प्रदेशातून ब्रिटनने माघार घेतली, आणि आपआपला देश बनवण्यासाठी अनेक वर्षं संघर्ष करणाऱ्या अरब आणि ज्यू लोकांमध्ये अंतर्गत युद्ध पेटलं. प्रश्न होता, ही भूमी नक्की कोणाच्या हातात जाणार. युद्ध तुल्यबळांचं नव्हतं. अरबांच्या तुलनेत ज्यूंची संख्या अतिशय कमी होती पण या दिवसाच्या तयारी गेले कित्येक वर्षं तिथे असणाऱ्या आणि इस्रायलचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी लढणाऱ्या प्रत्येक ज्यू ने अनेक वर्षांपासून केली होती. १४ मे १९४८ साली इस्रायलने आपलं स्वातंत्र्य घोषित केलं. 2000 वर्षांत पहिल्यांदा पूर्णपणे ज्यूंचा देश अस्तित्वात आला होता. मुस्लीमबहुल प्रदेशाच्या मधोमध ज्यूंचा देश निर्माण झाला.

## जेरुसलेम

इस्रायलची कथा सुरू होते जेरुसमलेममधून. सन १०९५. नोव्हेंबर महिन्यातल्या एका थंड सकाळी पोप अर्बन दुसरा याने फ्रान्सच्या क्लेअरमाऊंट शहरात दिलेल्या एका प्रवचनाने युरोपचा चेहरामोहरा बदलला. काय होतं त्या प्रवचनात असं? त्या प्रवचनाने २०० वर्षं चालेल्या ख्रिश्चन आणि मुस्लीम धर्मियांच्या युद्धाचं रणशिंग फुंकलं. या युद्धांना नंतर ख्रिश्चनांनी क्रुसेड्स असं नाव दिलं तर मुस्लिमांनी जिहाद. लॅटिन चर्चने १०९५ ते १२७१ या काळात होली लँड आणि होली सिटी मुस्लीम अधिपत्याखालून काढून त्या प्रदेशावर पुन्हा आपला ताबा मिळवण्यासाठी युद्ध केली. होली लँड म्हणजे आजचा इस्रायल, पॅलेस्टाईन, जॉर्डन, सिरिया आणि लेबेनॉनचा काही भाग आणि होली सिटी म्हणजे जेरुसलेम. हा तोच काळ होता जेव्हा धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्यातल्या संघर्षांने तसंच चर्चच्या विभागणीमुळे धर्मसत्तेचं आसन डळमळायला लागलं होतं. यातून बाहेर पडायचा एक रस्ता पोप अर्बन दुसरा याला दिसला, तो म्हणजे एका परकीय, पापी, धर्मबाह्य शत्रूविरोधात युद्ध घोषित करायचं आणि ख्रिश्चनांना एकत्रित करायचं. एक लाख ख्रिश्चन स्त्री, पुरुष, लहान मुलं सैनिक बनून साडेचार हजार किलोमीटरचा रस्ता कापत जेरुसलेमच्या वाटेला निघाले. एकाच वेळेस नाही, लहान लहान गटात. बीबीसीच्या 'द लँड ऑफ होली' या डॉक्युमेंट्रीमध्ये मध्ययुगीन इतिहासकार डॉ थॉमस ॲसब्रीज म्हणतात की, युरोप पार करताना हे गट तिथल्या वेगवेगळ्या भागातल्या ज्यू लोकांवर हल्ले करत त्यांचं शिरकाण करत निघाले होते. अर्थात तोवर जेरुसलेम मुस्लीम शासकांच्या हातात जाऊन ४०० वर्षं लोटली होती आणि या भागात ज्यूंचं प्रमाण नगण्य असलं तरी त्यांचं अस्तित्व कायम होतंच. क्रुसेडर्सचा पहिला जथ्था निघाल्यानंतर बरोबर चार वर्षांनी जेरुसलेम त्यांच्या ताब्यात आलं, त्यानंतर जवळपास १०० (१०९९ ते ११८७) जेरुसलेम आणि आसपासच्या भागात त्यांनी राज्य केलं. सालदिनच्या मुस्लीम योद्धांनी त्यांचा पराभव केला आणि होली लँड पुन्हा एकदा मुस्लीम शासकांच्या हातात गेलं. जेरुसलेम जगातल्या सगळ्यात जुन्या शहरांपैकी एक आहे. इतिहासाची पानं चाळली तर लक्षात येतं की जेरूसलेमवर अनेक शासकांनी राज्य केलं. इसवीसन पूर्व १७०० शतकात इथे कॅननाईट लोकांनी राज्य केलं, मग इजिप्तच्या फेरोंनी त्यानंतर आले इस्रेलाईट्स म्हणजेच आजचे ज्यू ज्यांचे वंशज आहेत असं समजलं जातं ते लोक. इसवीसन पूर्व १००० च्या पूर्वार्धात जेरुसलेम, आताचा इस्रायल, पॅलेस्टाईन, जॉर्डन, लेबेनॉन आणि सिरिया या देशांचा प्रत्येकी काही भाग मिळून इस्रेलाईट लोकांची दोन साम्राज्य होती. प्राचीन इस्रायल आणि जुडाहचं राज्य. जेरूसलेम जुडाहच्या राज्याची राजधानी होतं. प्राचीन इस्रायलच्या साम्राज्याचे उल्लेख हिब्रू बायबल तसंच काही धर्मग्रंथामध्ये सापडतात पण त्याचे ऐतिहासिक पुरावे कमी आहेत. मग कालांतराने हा भाग बॅबिलोनियन, पर्शियन, ग्रीक (अलेक्झांडर द ग्रेट ने आक्रमण केलं तेव्हा), रोमन, बायझेंटाईन आणि सरतेशेवटी मुस्लीम शासकांच्या अधिपत्याखाली आला. त्यानंतरही इथे सत्तापालट सतत होत राहिला. इथे राज्य करणारे शेवटचे शासक होते ऑटोमन.

या साम्राज्याचा अस्त ब्रिटिशांनी पहिल्या महायुद्धाच्या काळात १९१८ ला केला. वरती वर्णन केलेल्या भागाला लँड ऑफ इस्रायल किंवा होली लँड असंही म्हणतात. याचे उल्लेख अनुक्रमे हिब्रू बायबल आणि बायबलमध्ये आहेत. ज्यू धर्मियांमध्ये अशी मान्यता आहे की इथेच ज्यू धर्माचा उदय झाला, इथेच त्या धर्माचे कायदे तयार झाले आणि हीच भूमी देवाने वारसहक्काने ज्यू धर्मीयांना दिलेली आहे. त्यांची ही धार्मिक मान्यता जेनेसिस आणि एक्सोडस या हिब्रू बायबलच्या भागांवर आधारित आहे. 'ज्यू लोक एकदिवस आपल्या जमिनीवर (लँड ऑफ इस्रायलमध्ये) परत येतील' अशी भविष्यवाणी धर्मग्रंथात केली आहे. या भविष्यवाणीवरच ज्यू राष्ट्राची राजकीय संकल्पनाही आधारित होती. इतकी सगळी कथा सांगण्याचं कारण एकच की ज्यू लोकांना आपला देश बनवण्यासाठी हाच भूभाग का हवा होता ते लक्षात यावं. गंमत म्हणजे या भागात राहाणाऱ्या अरब मुस्लिमांना जग आज पॅलेस्टिनी म्हणून ओळखत असलं तरी या भूभागाला सगळ्यांत आधी प्राचीन ग्रीक लेखकांनी पॅलेस्टाईन म्हटलं होतं आणि पुढे रोमन शासकांनी ते नाव वापरलं. ऑटोमन साम्राज्यापर्यंत हे नाव कायम राहिलं.





## पहिलं महायुद्ध आणि जगाचा बदलत गेलेला नकाशा

आधुनिक जगाच्या इतिहासात पॅलेस्टाईन-इस्रायलच्या नात्याचं जे काही खोबरं झालं ते पहिल्या महायुद्धानंतर.ऑटोमन साम्राज्याचं राज्य इथे असताने शेजारच्या इजिप्तकडून किंवा सीरिकडून आक्रमणं होत राहायची. १८४० मध्ये ऑटोमन सम्राटांनी ही आक्रमण थांबवण्यासाठी ब्रिटिशांना मध्यस्ती करायला सांगितलं. ब्रिटिशांनी काही करार आणि फायद्यांच्या बदल्यात ते मान्य केलं. त्यानंतर या भागात थोडी शांतता प्रस्थापित झाली आणि पॅलेस्टाईनची सामाजिक-आर्थिक भरभराट व्हायला लागली. ऑटोमन साम्राज्याचा आधीपासून युरोपशी व्यापार होता. युरोपियन लोकांशी संपर्क वाढल्याने इथेही बदल व्हायला लागले. तोपर्यंत इथे ज्यू लोकांची संख्या अगदीच कमी होती. याच काळात युरोपमध्ये झायोनिस्ट चळवळीचा उदय झाला. ही एक राजकीय चळवळ होती ज्यात एका ज्यू राष्ट्राची स्थापना करणं हे उदिष्ट होतं. हिब्रू बायबलमध्ये 'झायन' हा शब्द जेरूसलेमसाठी वापरला आहे. पहिल्या महायुद्धाने या भागात मोठे बदल घडवले. तत्कालीन जगातलं सगळ्यांत मोठं मुस्लीम साम्राज्य असलेल्या ऑटोमनांनी युद्धात उडी घेतली आणि रशिया, फ्रान्स, ब्रिटन यांच्या विरोधात 'सैन्य जिहाद' घोषित केला. जर्मनांशी हातमिळवणी करून ऑटोमनांनी सुएझ कालवा ताब्यात घेण्यासाठी इंग्लंडच्या अधिपत्याखाली असलेल्या इजिप्तवर हल्ला केला. युद्धाचे तपशील बरेच आहेत पण महत्त्वाचं इतकंच की ऑटोमनांचा पराभव झाला. जर्मनीचा झालाच होता. ऑटोमन साम्राज्याचे तुकडे होऊन पॅलेस्टाईन ब्रिटिश प्रशासित प्रदेश झाला तर सीरिया आणि लेबेनॉन फ्रेंच प्रशासित प्रदेश झाले. पॅलेस्टाईनचा भाग आता सरळ सरळ ब्रिटनच्या अधिपत्याखाली होता म्हटल्यावर या भागात स्वतंत्र ज्यू राष्ट्र निर्माण करा अशी मागणी करणारे युरोपातले आवाज बुलंद व्हायला सुरूवात झाली.

## इस्रायलची स्थापना आणि अरब राष्ट्रांचा हल्ला

वाढत्या नाझी प्रपोगंडामुळे युरोपमधले ज्यू पळून जात होते, पण अनेक देशांची दार त्यांना बंद होती. वाढत्या ज्यू स्थलांतरितांमुळे पॅलेस्टाईन प्रदेशात असंतोष वाढत होता, त्यामुळे ब्रिटीशांनीही ठरवलं की ज्यूंचं येणं थांबवायचं. ज्यू आता अवैधरित्या या भागात प्रवेश करायला लागले. १९२० ते १९४० या काळात या प्रदेशातल्या ज्यू आणि अरब लोकांमध्ये सतत संघर्ष होतच होता. अनेकदा दंगलीही व्हायच्या. दुसरं महायुद्ध भडकलं तेव्हा पॅलेस्टाईन त्यातून वेगळं राहू शकलं नाही. ब्रिटिशांबरोबर लढण्यासाठी ज्यू लोकांचं सैन्य स्थापन करून त्यांची मदत घ्यावी असा प्रस्ताव तत्कालीन पंतप्रधान चर्चिल मांडला पण ब्रिटीश सरकार आणि सैन्याने तो फेटाळला. त्यांचं म्हणणं होतं सैन्यात ज्यू आणि अरब लोकांची संख्या समसमान असावी. पण अरबांना ब्रिटिशांकडून लढण्यात रस नव्हता. त्यांचे नेते, जेरूसलेमचे मुफ्ती नाझी जर्मनीच्या बाजूने वळाले. याच काळात ज्यू लोकांचं स्थानिक सैन्य तयार झालं होतं ज्याचं नाव होतं हागनाह (संरक्षण दल). अरबांनी ब्रिटिशांच्या विरोधात उठाव करायला सुरुवात केली. जाफामध्ये हल्ले व्हायला लागले. ब्रिटिशांनी सैन्याला पाचारण केलं. या युद्धात ५००० हून जास्त अरबांचा मृत्यू झाला. जेरूसलेमचे मुफ्ती अल-हुसैनी फ्रेंच प्रशासित सीरियाला पळाले. दुसरं महायुद्ध संपल्यानंतर १९४७ मध्ये ब्रिटनने पॅलेस्टाईनचा प्रश्न संयुक्त राष्ट्रांसमोर मांडला. संयुक्त राष्ट्रांनी तोडगा दिला की एक स्वतंत्र ज्यू राष्ट्र असावं, एक स्वतंत्र अरब राष्ट्र असावं आणि जेरूसलेमवर आंतरराष्ट्रीय नियंत्रण असावं. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने या प्रस्तावावर शिक्कामोर्तब केलं आणि ज्यूंना पॅलेस्टाईनमध्ये यायला मज्जाव करता येणार नाही असं सांगितलं. ब्रिटन दुसऱ्या महायुद्धानंतर आधीच जर्जर झाला होता. १९४८ साली पॅलेस्टाईनमधल्या ज्यू लोकांनी स्वातंत्र्याची घोषणा केली आणि इस्रायलची निर्मिती झाली. ज्यू लोकांना दोन हजार वर्षांनंतर स्वतःचा देश मिळाला होता. इस्रायलची स्थापना झाल्या झाल्या त्याला अमेरिका आणि रशिया या दोन्ही शक्तिशाली देशांनी मान्यता दिली. ब्रिटिशांनी पॅलेस्टाईनमधून माघार घेतली आणि देशांतर्गत ज्यूंचं आणि अरबांचं सैन्य एकमेकांना भिडलं. पॅलेस्टिनी अरबांच्या मदतीना जॉर्डन, सीरिया, इराक लेबेनॉन, इजिप्तचंही सैन्य आलं. पाच देशांनी मिळून इस्रायलवर आक्रमण केलं होतं. इस्रायलची स्थापना होऊन अजून एक दिवसही झाला नव्हता. देशाची लोकसंख्या होती आठ लाखाच्या आसपास. देशच अस्तित्वात नव्हता, त्यामुळे इतर देशांशी शस्त्रास्त्र करार करण्याचा प्रश्न नव्हता. अरब देशांचं सैन्य इस्रायलच्या सैन्याच्या कितीतरी पट जास्त होतं. पण दुसऱ्या महायुद्धात मित्रराष्ट्रांच्या बाजूने लढलेले आणि काही महत्त्वाच्या लढायांमध्ये मोक्याची भूमिका बजावलेले सैन्याधिकारी ज्यू होते आणि आता ते इस्रायललाठी लढत होते. जून महिन्यात संयुक्त राष्ट्रांच्या सांगण्यावरून इस्रायल आणि अरब राष्ट्रांनी युद्धविरामाची घोषणा केली. इस्रायलला आपली रसद पुन्हा भरून घेण्याची संधी मिळाली. रशियासारखी मोठी राष्ट्र त्यांना मागच्या दाराने मदत करत होती. त्यामाने अरब सैन्यात सुसुत्रता कमी होती. पाच राष्ट्रांचं सैन्य मिळूनही इस्रायलचं अस्तित्व नकाशावरून पुसू शकलं नाही. पण इस्रायलचा काही भूभाग मात्र त्यांनी ताब्यात घेतला. जॉर्डनकडे वेस्ट बँक भाग गेला, इजिप्तने गाझा पट्टी मिळवली. पूर्व जेरूसलमेही त्यांच्या हातातून निसटलं.

## नकबा

गाझा पट्टीच्या कोणत्या भागात तुम्ही उभे आहात यावर ठरतं की १४ मे १९४८ हा तुमच्यासाठी आनंदाचा दिवस आहे की शोकाचा.पॅलिस्टिनी लोक या दिवसाला नकबा म्हणतात. १४ मे च्या ऐवजी १५ मेला हा दिवस पाळून ते याला पॅलिस्टिनी लोकांच्या इतिहासातला सगळ्यांत काळा दिवस मानतात. इतिहाकार बेनी मॉरिस आपल्या 'द बर्थ ऑफ द रिवाइज्ड पॅलेस्टिनियन रिफ्युजी प्रॉब्लेम' या पुस्तकात लिहितात की, १४ मे १९४८ च्या दुसऱ्या दिवशी साडेसात लाख पॅलेस्टिनी नागरिक इस्रायली सैन्याच्या भीतीने घरदार सोडून पळून गेले, अनेकांना पळवून लावलं गेलं. अनेकांनी नेसत्या वस्त्रांनिशी घरदार सोडलं. काहींनी घराला कुलूपं लावली आणि पळले. या घरांची कुलूपं उघडायला ते परत कधी येऊ शकले नाहीत. यांच्या चाव्या या दिवसाची आठवण म्हणून जपल्या गेल्या फक्त.

## बाल्फोर जाहिरनामा

ऑटोमन शासकांचा पहिल्या महायुद्धात पराभव होता होता ब्रिटनने बाल्फोर जाहीरनामा आणला. हे युरोपातल्या झायनेस्ट चळवळीचं फळ होतं. ज्यू राष्ट्राच्या मागणीला दिलेली ही पहिली अधिकृत मान्यता होती. पण या बाल्फोर जाहीरनाम्यात असं नक्की म्हटलं तरी काय होतं? 'इंग्लंडच्या राजसत्तेचा पॅलेस्टाईनमधल्या ज्यू लोकांच्या देशाला पाठिंबा आहे, आणि ज्यू लोकांना एक राष्ट्र मिळावं यासाठी मदत करण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येईल. पण त्याआधी हे स्पष्टपणे लक्षात घेतलं पाहिजे की असं करताना पॅलेस्टाईननध्ये राहाणाऱ्या ज्यू धर्मीय सोडून इतर लोकांच्या नागरी आणि धार्मिक हक्कांवर गदा येता कामा नये. तसंच इतर देशात राहणाऱ्या ज्यू लोकांचे हक्क आणि राजकीय स्थान याला धक्का लागता कामा नये.' या जाहीरनाम्यानंतर या प्रदेशात ज्यू लोकांसाठी देश निर्माण करण्याची जबाबदारी आणि पर्यायाने या प्रदेशात प्रशासन करण्याची जबाबदारी राष्ट्रसंघाने (लीग ऑफ नेशन्स) ब्रिटनवर टाकली. इथे येणाऱ्या ज्यूंची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. १९20 ते १९४0 या दशकांत मोठ्या प्रमाणात ज्यू इथे यायला लागले. विशेषतः दुसऱ्या महायुद्धात हिटलरने लाखो ज्यूंचा नरसंहार करायला सुरुवात केल्यानंतर युरोपमधले हजारो ज्यू आपला जीव वाचवून या प्रदेशात पळून आले. बाल्फोर जाहीरनाम्यात म्हटलं होतं की इथे ज्यूंसाठी वेगळं 'राष्ट्रीय घर' बनवलं जाईल. हा प्रदेश तसाही ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली होता त्यामुळे इथे येणारे ज्यू असंच समजत होते की एक ना एक दिवस इस्रायल बनेल आणि झालंही तसंच. ब्रिटीशांनी बाल्फोर जाहीरनामा सादर का केला आणि ज्यू लोकांसाठी वेगळं राज्य बनवण्याचं वचन का दिलं? न देऊन सांगता कोणाला? त्यांच्यावर दबावच तेवढा होता, लेखक पत्रकार निळू दामले उत्तरतात. त्यांनी इस्रायल-अरब संघर्षाचा जवळून अभ्यास केलाय आणि यावर जेरुसलेम नावाचं पुस्तकही लिहिलं आहे. झायनिस्ट चळवळीचा उदय साधारण १८९0 च्या काळात ब्रिटनमध्ये झाला. त्यातले ज्यू ब्रिटिशांचे सावकार होते. त्या चळवळीतला मोठा नेता रॉथ्सचाईल्ड प्रचंड श्रीमंत होता. युरोपातली अशी अनेक श्रीमंत कुटुंब यात गुंतलेली होती. त्यामुळे त्यांना नाराज करणं ब्रिटिशांना परवडणारं नव्हतं, विशेषतः युद्धकाळात, जेव्हा सरकारला पैशाची गरज होती, ते म्हणतात. पण हा जाहीरनामा म्हणजे हलवायाच्या घरावर तुळशीपत्र होतं असंही सांगायला ते विसरत नाहीत, ब्रिटिशांचं काय जात होतं पॅलेस्टाईनच्या भूमीत इस्रायल वसवू असं आश्वासन द्यायला. त्यांना काहीच द्यायचं नव्हतं.

# वाचा म्हणजेच विज्ञान शिका, अंधश्रद्धा घालवा, शाळा विविध उपक्रमाची देण

### डॉ.मुजाहेंद, डॉ.हजारी, ॲड शफिक यांचे प्रतिपादन



बीड, (दिव्य न्युज) : विज्ञान दिनाचे औचित्य साधून आझाद हिंद सेमी इंग्लिश उर्दू शाळेत सायन्स डे -विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. मुलांनी एकूण अंशी प्रोजेक्टाचे सादरीकरण केले होते. त्यांचे उदघाटन डॉ. मुजाहेंद बीड सिव्हिल हॉस्पिटल, बीड शहरातील नामांकित डॉ विशाल हजारी, अडो शेख शफिक-अध्येक्ष एआयएमआयएम बीड भाऊ यांच्या शुभस्ते करण्यात आले. समवेत समवेत मो. इसहाक विषय तज्ज्ञ, शोएब शेख उ्थज, संस्था सचिव शेख मुसा, शेख वाजेद, सय्यद असेफ हे होते.

यावेळी मुलांना, पालकांना संबोधित करताना डॉ मुजाहेंद म्हणाले की कुराण मध्ये स्पष्ट सांगितली की वाचा -पढो म्हणजे विज्ञानवादी होऊन जगाला खरे ज्ञान मिळवून द्या. डॉ हजारी म्हणाले की विज्ञानामुळे अंधश्रद्धा दूर होऊन योग्य मार्ग सापडतो तर ॲड शफिक भाऊ यांनी मुलांना शाळेने सर्व उपक्रम राबून प्रगत देशा बरोबरीने ज्ञान उपलब्ध करून द्यावे असे प्रतिपादन केले. मुलांनी केलेले प्रत्यक्षिक प्रयोग पाहून मान्यवरांनी कौतुक करून काही सुधारणा सुचवल्या एकूण बारा प्रयोग निवडून पहिले चार ला प्रथम, दुसरे, तिसरे बक्षीसे देऊन मुलांचा आत्मविश्वास वाढवला.कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन मुअ बशीर सिद्दीकी, सय्यद अवेज, शेख अय्याज, शेख मुद्दशीर,शेख फैसल यांनी केले. विज्ञान प्रदर्शनीचा मुला बरोबर पालक व परिसरातील नागरिकांनी आनंद घेतला.

# शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार शेतकरी विरोधी कायद्यांची होळी ! शेतकरी विरोधी सरकारच्या नावाने बोंबा ठोकल्या

### एनडीपीएस कायद्यांतर्गत बदल करून शेतकऱ्यांना गांजा,अफु, तंबाखू लागवडीस परवानगी द्या-डॉ.गणेश ढवळे

बीड, (दिव्य न्युज) : एनसीबीआरच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये भारत देशात १०,७०० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यात महाराष्ट्र राज्यात ३८.५ टक्के प्रमाण असुन महाराष्ट्र पहिल्या स्थानावर आहे. मराठवाड्यात गेल्या सन २०२५ वर्षात ११२९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यात २५६ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन नव वर्षाच्या सुरुवातीला दिड महिन्यात ३९ शेतकऱ्यांनी आत्महत्यांची नोंद आहे. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे आणि शेतकरी विरोधी कायद्यांमुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे.याच्या निषेधार्थ आणि शेतकऱ्यांचे आर्थिक जिवनमान उंचावत शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी एनडीपीएस कायद्यात बदल करून शेतकऱ्यांना गांजा,अफु,तंबाखु लागवडीसाठी रीतसर परवानगी देण्यात यावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०२ होळी दिवशी सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकरी विरोधी




कायद्यांची होळी करत सरकार विरोधी धोरणांच्या निषेधार्थ बोंबा ठोकत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. निवेदन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय कृषिमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले.यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,शेख युनुस,सुदाम तांदळे,शेख मुबीन, बाळासाहेब मोरे पाटील (प्रांताध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच) माजी सैनिक अशोक येडे ( बीड जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी) ,रामधन जमाले ( बीड जिल्हाध्यक्ष इंटक), कुलदीप करपे(बीड जिल्हाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना), सुहास जायभाये ( बीड जिल्हा कोषाध्यक्ष डीवायएफआय), डॉ.संजय तांदळे ( अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ता संघटना बीड), प्राचार्य डी .जी.तांदळे(बीड अध्यक्ष किसान सभा महाराष्ट्र राज्य),प्रा.कॉ. विठ्ठलराव सवासे (किसान सभा म.रा.बीड ), प्रभाकर धुमाळ, राजेंद्र धुमाळ,माऊली शिंदे जिल्हा सदस्य आम आदमी पार्टी बीड आदी सहभागी होते.

सविस्तर माहितीस्तव : एनसीबीआरच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये भारतात १०,७०० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन महाराष्ट्र सर्वप्रथम क्रमांकावर असुन ३८.५ टक्के प्रमाण आहे. महाराष्ट्रात मराठवाड्यात बीड जिल्ह्यात गेल्या वर्षी २५६ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन नविन वर्षाच्या सुरुवातीला दिड महिन्यात ३९ शेतकऱ्यांनी मृत्युला कवटाळले आहे. निसर्गाची अवकृपा,,वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला योग्य भाव नसणे, शेतीमालाला निर्यातबंदी आणि कर्जबाजारीपणा या शेतकरी विरोधी धोरणा बरोबरच कमाल शेतजमीन धारणा कायदा, आवश्यक वस्तु कायदा, जमिन अधिग्रहण कायदा हे नरभक्षी कायदे रद्द करण्यात यावेत. शेतीमालाला निर्यातबंदी कायमची रद्द करावी. तसेच शेतीमालाला भाव मिळत नसल्याने एनडीपीएस कायद्यांतर्गत बदल करून शेतकऱ्यांना सशर्त गांजा,अफु, तंबाखू लागवडीस परवानगी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

# जीव गेला तर लेकरं उघड्यावर येतील



## बांधकाम मजुरांचा केविलवाणा आक्रोश; विभागाच्या कोनाळेंचे कानावर हात

- मजुरांचा बळी गेल्यावरच जाग येणार का ?
- मृत्यूच्या दारात मजुरांचे काम; कोनाळे साहेब, विभाग करतोय काय ?
- हेल्मेट नाही, बेल्ट नाही अन् जाळीही गायब
- बिल्डरांची मग्रुरी अन् प्रशासनाचे बहिरेपण
- सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून मजुरांचा मृत्यूशी खेळ




### काँक्रीटच्या जंगलात मजुरांचा जीव डेथ ट्रॅपमध्ये

बीड । दिव्य वार्ता ।

**जिल्हा कामगार कार्यालयातील भ्रष्टाचाराचा अजगर बाहेर काढण्यासाठी मोठ्या अपेक्षेने हिंगोलीवरून विशेष दक्षता पथक दाखल झाले खरे, मात्र या पथकाने न्यायाऐवजी केवळ 'कागदी घोडे' नाचवण्यालाच पसंती दिली आहे. मृतांना कागदोपत्री जिवंत दाखवून लाखो रुपये लाटणाऱ्या भ्रष्ट अधिकारी, गुत्तेदार आणि एजंटच्या त्रिकुटाने या पथकाचा जंगी प्रोटोकॉल केला आणि त्यानंतर हे पथक चहा-पाण्याचा आस्वाद घेऊन पुन्हा हिंगोलीला रवाना झाले. ही चौकशी होती की भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याचा फार्स, असा जळजळीत सवाल आता बीडच्या जनतेतून विचारला जात आहे. जिल्हा कामगार कार्यालयातील कारभार हा सध्या भ्रष्टाचाराचे केंद्र बनला आहे. फॅक्टचेक केल्यास धक्कादायक वास्तव समोर येते, की येथे खऱ्या कामगाराला त्याच्या हक्काच्या विवाहाच्या किंवा शैक्षणिक अनुदानासाठी ५० टक्के कमिशन मागितले जाते. जे पैसे देत नाहीत, त्यांचे अर्ज कचराकुंडीत फेकले जातात. दुसरीकडे, जे कामगार अस्तित्वातही नाहीत, अशा मृत व्यक्तींना कागदोपत्री जिवंत दाखवून त्यांच्या नावावर बोगस नोंदी केल्या गेल्या आहेत आणि लाखो रुपयांची शिष्यवृत्ती लाटली गेली आहे. हे सत्य उघड करण्यासाठी उपायुक्तांनी पथक पाठवले, पण ते पथक प्रत्यक्ष कामाऐवजी त्याच आरोपी अधिकाऱ्यांच्या खुचर्चीला खुर्ची लावून बसल्याचे पाहायला मिळाले. ही दृश्ये पाहून कामगारांच्या उरल्यासुरल्या आशाही आता मावळल्या आहेत.**

हातात शिदोरी घेऊन घराबाहेर पडताना देवाला केलेली कळकळीची प्रार्थना... अन् त्याच दिवशी आपला जीव जाईल याची कल्पनाही त्या बिचाऱ्या मजुराला नव्हती. ६ महिन्यांपूर्वी बीडच्या डीपी रस्त्यावर इमारतीचे बांधकाम सुरू होते अन् त्यावरून पडून त्याचा मृत्यू झाला. आपला जीव मुठीत धरून शहरात आजचा दिवस सुखरूप जावा ही राबणाऱ्या मजुरांना आपल्या जिवाची चिंता आहे. दररोज कशाचीही पर्वा न करता ते उंच इमारतींच्या सांगाड्यांवर चढतात. शहरात आज काँक्रीटची जंगले उभी राहत आहेत, चकाकणाऱ्या काचांच्या इमारतींचे इमले चढत आहेत. पण या आलिशान इमारतींचा डोलारा ज्यांच्या खांद्यावर पेलला जातोय, त्याच बांधकाम कामगारांच्या जिवाचा खेळ मात्र अत्यंत क्रूरपणे मांडला गेला आहे.

पाच-सहा मजल्यांच्या उंचीवर, मृत्यूशी दररोज गाठ घालून काम करणाऱ्या या मजुरांच्या सुरक्षेचा प्रश्न वाऱ्यावर सोडून देण्यात आला असून भ्रष्टाचारात माखलेला जिल्हा कामगार विभाग अन् अधिकारी सुधाकर कोनाळे, निरीक्षक अजय काशीद कुणाचे हित जपण्यासाठी डोळेझाक करत आहेत, असा जळजळीत सवाल आता उपस्थित होत आहे.

मृत्यूच्या छायेत प्रगतीचे काम बाहेरून पाहणाऱ्याला हे फक्त एक भव्य बांधकाम वाटते, पण तिथे राबणाऱ्या मजुरांसाठी ते मृत्यूचा सापळा बनले आहे. सुरक्षा साधनांशिवाय काम करताना एखाद्याचा पाय घसरला, तर त्याचे प्राण वाचवण्यासाठी तिथे साधी सुरक्षा जाळीही नसते. कामगारांच्या डोक्यावर हेल्मेट नाही, कंबरेला सेफ्टी बेल्ट नाही आणि पायात साधे बूटही नाहीत. अशा अवस्थेत शंभर फूट उंचीवर सिमेंटचे जड घमेले वाहून नेताना या मजुरांच्या मनात जी धडधड असते, ती एसी केबिनमध्ये बसणाऱ्या कोनाळे आणि इतर अधिकाऱ्यांना कधी समजणार का? मजुरांचे प्राण इतके स्वस्त झाले आहेत का, की बिल्डरांच्या नफ्यापुढे त्यांच्या आयुष्याची किंमत शून्य ठरवली जात आहे, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

कामगार कार्यालयाचा कागदी आणि संशयास्पद कारभार या संपूर्ण भयावह परिस्थितीवर जिल्हा कामगार कार्यालयाची भूमिका अत्यंत संशयास्पद आणि मवाळ दिसून येत आहे. जर कायद्याचे नियम पायदळी तुडवले जात असतील, तर या कार्यालयाची धडक तपासणी मोहीम फक्त कागदावरच मर्यादित आहे का?

बांधकाम सुरू करण्यापूर्वी सुरक्षिततेचे ऑडिट करणे अनिवार्य आहे. तुमच्या कार्यालयाने गेल्या सहा महिन्यांत बीडमधील किती विकासकांच्या (बिल्डर्स) साइट्सवर प्रत्यक्ष जाऊन तपासणी केली ? किती जणांना नोटीस बजावली आणि किती जणांचे काम बंद पाडले? याचे उत्तर प्रशासनाकडे नाही. वेळ निघून जाण्याआधीच यंत्रणेला जाग येणे गरजेचे आहे. उद्या एखादा अनर्थ घडला, तर त्याला केवळ नशीब म्हणून जबाबदारी झटकता येणार नाही. त्या मृत्यूस केवळ बिल्डर जबाबदार नसून, कर्तव्यात कसूर करणारा कामगार विभाग हा सुद्धा तितकाच गुन्हेगार असेल. योजनांच्या माहितीचा अभाव अन् प्रशासनाचे अपयश अनेकांना हे ठाऊकच नाही, की त्यांच्या सुरक्षेसाठी बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ आणि विविध विमा योजना उपलब्ध आहेत. या योजनांची माहिती तळागाळातील मजुरांपर्यंत पोहोचवण्यात प्रशासन सपशेल अपयशी ठरले आहे. मजुरांच्या घामातून जमा होणारा उपकर कोट्यवधींच्या घरात आहे, पण तो त्यांच्या सुरक्षेसाठी वापरला जातोय का? की फक्त कंत्राटदारांच्या आणि अधिकाऱ्यांच्या फाइल्समध्येच तो बंदिस्त आहे? बिल्डरांवर जरब बसवण्याऐवजी त्यांच्याशी संधान साधण्याचे काम तर इथली यंत्रणा करत नाही ना, अशी शंका घेण्यास वाव मिळत आहे.

### प्रशासनाचे बहिरेपण आणि कामगारांची हतबलता

**अनेक कामगार परजिल्ह्यांतून किंवा ग्रामीण भागातून रोजंदारीसाठी येतात. त्यांना आपली सुरक्षा महत्त्वाची वाटते, पण काम गमावण्याच्या भीतीने ते तक्रार करायला धजावत नाहीत. त्यांच्या या हतबलतेचा आणि गरिबीचा गैरफायदा घेणाऱ्या मुजोर बिल्डरांना पाठीशी घालण्याचे काम जिल्हा कामगार कार्यालय करत आहे. वारंवार सामाजिक कार्यकर्त्यांनी तक्रारी करूनही या कार्यालयाकडून मिळत असलेला थंडा प्रतिसाद संतापजनक आहे.**

### कारवाई होणार की नाही

एखादा मोठा अपघात घडून निष्पाप कामगाराचा बळी गेल्यानंतरच प्रशासन सावध पवित्रा का घेते ? सुरक्षेसाठी प्रतिबंधात्मक पावले उचलण्याचे दायित्व नक्की कोणाचे ? साइट्सवर सुरक्षा साधने न वापरता काम करून घेणाऱ्या बिल्डरांवर कारवाई करण्यास यंत्रणा का कचरते? त्यांच्यावर नेमका दबाव कोणाचा आहे? हे प्रश्न आता ऐरणीवर आले आहेत, त्यामुळे फक्त चौकशीच होणार का, हे पाहावे लागेल.

> रोज सकाळी कामावर निघताना आजचा दिवस सुखरूप निघून जावा, अशी प्रार्थना करूनच आम्ही घराबाहेर पडतो. आम्हाला माहितीये, आमचा जीव गेला तर बिल्डर थोडी नुकसानभरपाई देऊन हात झटकणार आणि प्रशासन फाइल बंद करणार. आमची किंमत या शहरात काही उरली नाहीये का?
>
> -कामगार

> वरती चार ते पाचव्या मजल्यावरून काम करताना पाय घसरला, तर खाली आम्ही पडतो, बिल्डरची बिल्डिंग नाही. आमचा जीव गेला तर आमची लेकरं उघड्यावर येतील. आजपर्यंत कामगार कार्यालयाचा एकही अधिकारी इथे येऊन बघायला आला नाही. ते एसीमध्ये बसून रिपोर्ट तयार करतात की काय?
>
> -कामगार

### फक्त अहवाल करत आहात का?

**एकीकडे कामगार कायद्यांची मोठी जंत्री आहे, नियमावलीचे जाडजूड पुस्तक आहे, पण बांधकामाच्या ठिकाणची वास्तव परिस्थिती पाहिली की, या सर्व नियमांना खो देण्यात आल्याचे स्पष्ट दिसते. बीडमधील अनेक बांधकामांच्या ठिकाणी सुरक्षेच्या नावाखाली शून्य व्यवस्था आहे. प्रशासकीय अधिकारी केवळ कार्यालयात बसून अहवाल तयार करण्यात मग्न आहेत की काय, असा संताप नागरिक व्यक्त करत आहेत.**

# पिंपळसुटी गाव ठरतय हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक



आष्टी (प्रतिनिधी) पिंपळसूटी ता. आष्टी येथे श्री. संभाजी सकट व श्री. जावेद सय्यद यांच्या पुढाकाराने संत गाडगेबाबा जयंती व रमजान ईद महिन्याचे औचित्य साधत ग्रामस्वच्छता अभियान राबवण्यात आले. हातात झाडू घेऊन स्वच्छता व एकतेचा संदेश देण्यात आला. गावातील रस्ते, मारुती मंदिर तसेच दंबरहजारी बाबा परिसर एकत्रितपणे स्वच्छ करण्यात आला. या स्वच्छता अभियानादरम्यान संत गाडगेबाबा यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. मानवाची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असा संदेश देण्यात आला. शिक्षणाशिवाय प्रगती नाही, परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे, पर्यावरण संवर्धन केले पाहिजे, सामाजिक सलोखा ठेवला पाहिजे असे मत श्री. संभाजी सकट व जावेद सय्यद यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

पिंपळसूटी हे बीड जिल्ह्यातील सीना नदीच्या काठेवर वसलेले छोटे व शेवटचे गाव असले तरी येतील वयस्कर पिढी व तरुण मुले एकत्रितपणे कधी मंदिर तर कधी दर्ग्यासमोरील ओट्यावर बसून गावच्या विकासासंदर्भात चर्चा करतात. पिंपळसुटी गावचे वैशिष्ट्य म्हणजे येथे दिवाळी, दसरा अथवा रमजान ईद असो गावातील सर्व हिंदू व मुस्लिम बांधव एकमेकांना घरी बोलावून फराळ देतात. गावच्या यात्रेवेळी दंबरहजारीबाबांच्या दर्ग्यावर चादर अर्पण केली जाते. गावातील मारूतीचा सप्ता असो की दंबरहजारीबाबाचा उरूस असो सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. गावच्या यात्रेनिमित्त सर्व जाती धर्मातील मंडळी एकत्रितपणे निर्णय घेऊन पंचक्रोशीतील लोकांना भोजनाची व्यवस्था करतात. शिक्षण क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले जाते. गावात अनेक वेळा समाजप्रबोधनपर कार्यक्रम आयोजित केले जातात. श्री. संभाजी सकट व जावेद सय्यद यांनी 'एक गाव एक गणपती' या संकल्पनेप्रमाणे पिंपळसुटी गावात पर्यावरणपूरक गणपती बसवण्यास नेहमीच प्राधान्य दिले. संकट काळी एकमेकांना मदतीचा हात दिला जातो. पिंपळसुटी गावाची परंपरा व आजच्या तरुण पिढीच्या सततच्या प्रयत्नाने आजही पिंपळसुटी गावात सामाजिक ऐक्य व बंधुभावाची भावना टिकून आहे. श्री. संभाजी सकट यांचे वडील दादासाहेब सकट पिंपळसुटी गावचे निवृत्त पोलीस पाटील आहेत तर जावेद सय्यद यांच्या वडिलांची ओळख पंचक्रोशीतील जहागीरदार अशी असे. वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून महापुरुषांचे विचार समाजामध्ये पोहोचले पाहिजेत अशी दोघांचीही धारणा आहे. आजच्या काळात सामाजिक सलोखा विरळ होत चालला आहे की असे वाटत असतानाच आष्टी तालुक्यातील पिंपळसुटी गावाने मात्र आदर्शाचा एक नवा वास्तूपाठच घालून दिला आहे. गावातील मान्यवरांनी संभाजी सकट व जावेद सय्यद यांना प्रोत्साहन देत प्रत्येक गावाने सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि माणुसकी जपली पाहिजे. जात, धर्म, वंश भेद न करता सर्वांनी एकत्र राहून भारतीय संस्कृती पुढे नेली पाहिजे असा मनोदय व्यक्त केला. या स्तुत्य उपक्रमाबद्दल संभाजी सकट, जावेद सय्यद व सर्व ग्रामस्थांचे पंचक्रोशीतून विशेष कौतुक होत आहे.



कादरी जैनब फातिमा शाहेद (वय-७) हिने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पुर्ण केला.

## चिमुकल्या रोजेदाराचा दृढ ईमान; अब्दुल राफे रईस खान यांचा पहिला रोजा

परतूर (दिव्य न्युज) : पवित्र रमजान महिन्यात जिथे मोठी मंडळी इबादत आणि साधनेत तल्लीन असतात, तिथेच लहान मुलांमध्येही इबादतीविषयी विशेष आकर्षण दिसून येत आहे. परतूर येथील मौलाना आझाद कॉलनीतील रहिवासी पठाण रईस खान (शिक्षक) यांचे सुपुत्र अब्दुल राफे रईस खान यांनी अल्पवयात आपला पहिला रोजा पूर्ण करून कुटुंबीय व परिसरातील नागरिकांच्या मनात आनंद निर्माण केला आहे.



नऊ वर्षीय अब्दुल राफे यांनी रमजान महिन्याच्या अकराव्या दिवशी (१ मार्च) पूर्ण दिवसाचा रोजा यशस्वीरीत्या पाळला. त्यांनी आपल्या धार्मिक निष्ठेचे व इबादतीविषयीच्या आवडीचे सुंदर उदाहरण सादर केले. कुटुंबीयांच्या माहितीनुसार, त्यांनी संपूर्ण दिवस आनंदाने व उत्साहाने घालवला आणि इफ्तारपर्यंत संयम राखला. इफ्तारच्या वेळी घरी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. ज्येष्ठांनी या चिमुकल्या रोजेदाराचे कौतुक करून त्याला आशीर्वाद दिले.

यावेळी नातेवाईक व मित्रपरिवारानेही शुभेच्छा देत त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. अशा प्रेरणादायी घटनांमुळे नव्या पिढीत धार्मिक जाणीव आणि संस्कार अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

## यासेर साजेद शेख या चिमुकल्याने आठव्या वर्षी पहिला रोजा केला पुर्ण

चकलांबा, (दिव्य न्युज) : मादळमोही येथील शेख साजेद सर यांचे चिरंजीव यासेर शेख वय आठ वर्षे या चिमुकल्याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा दि.१ मार्च २०२६ रविवार रोजी पुर्ण केला. पवित्र रमजान महिन्याच्या आगमनासोबतच उपवासाची सुरवात झाली असून कडक उन्हाळ्याच्या झळाया असुनही मोठ्या सोबतच आता लहान मुलांमध्येही रोजा धरण्याची उत्सुकता दिसुन येते आहे.अशा या दिवसभर जवळपास १३तास पहाटेच्या सहरी पासुन सायंकाळच्या इफ्तार पर्यंत अन्न किंवा पाण्याचा थेंबही न घेता उपाशी राहुन आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पुर्ण केला. सायं.इफ्तारसाठी सर्वांसोबत आपल्या परिवारासह रोजा इफ्तार केला.या यासेरच्या पहिल्या रोजा बद्दल त्याचे वडील साजेद सर व आई, चुलते नय्युम भाई व खय्युम भाई आणि - चुलती, नेकनुर येथील नाना खलील भाई व नानी,मामा अजहर, फजल व मामी तसेच इतर नातेवाईकांनी अभिनंदन केले. यासेरला पहिल्यांदाच रोजा असल्यामुळे त्याने अत्यंत उत्साहाने आणि आनंदात पार पडला. या चिमुकल्याने पहिला रोजा ठेवल्याने त्याचे सर्व स्तरातून तसेच, मित्र परिवाराकडून शुभेच्छांचा वर्षाव आणि कौतुक होत आहे. या प्रसंगी कुटुंबीयांनी अल्लाह कडे प्रार्थना करत आयशाच्या उत्तम आरोग्य उज्वल भवितव्यासाठी दुआ केली.





शेख कैफ शेख रेहान (वय-७) याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पुर्ण केला.



काझी मुहिबुर्रहमान मुशाहेद (वय-८) याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पुर्ण केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०